ISSN: 2348-1390 ❷ IMPACT FACTOR: 6.033(SIJIF)

# NEW MAN

## INTERNATIONAL JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES

VOL. 12 ISSUE 4 APRIL 2025

A PEER REVIEWED AND INDEXED MONTHLY E-JOURNAL

*Editor- in- Chief*
**Dr. Kalyan Gangarde**
*Director,*
*Centre for Humanities and Cultural Studies, Kalyan (W)*

*Issue Editors*
**Dr. B. D. Jadhvar**
*Department of History*
*Balbhim Mahavidyalaya Beed*

✦ NEW MAN PUBLICATION ✦
www.newmanpublication.com
परभणी

22. मध्ययुगीन काळातील परकीय व अंतर्गत व्यापार आणि उद्योगधंदे
*प्रा. डॉ. घोलप के.जी.*
23. १८५७ च्या उठावातील स्त्रियांचा सहभाग
*प्रा. डॉ. अरुण शिवराम बावा*
24. भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील स्त्रियांचे योगदान
*प्रा. डॉ. अविनाश बाबुराव मुळे*
25. विठ्ठल स्वामी मंदिर हम्पी – मध्ययुगीन स्थापत्य कलेचा उत्कृष्ठ अविष्कार
*प्रा. डॉ. विठ्ठल बाबुराव गुंडे*
26. १८५७ च्या स्वातंत्र्य समरात नरगुंद संस्थानाचे योगदान
*डॉ. रामचंद्र पांडूरंग पवार*
27. शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांचे शेतकरी चळवळीतील योगदान
*श्री. अनाप एस. ए., प्रो. डॉ. किशोरकुमार गव्हाणे*
28. मध्ययुगीन भारतातील महिलांचे राजकारण आणि प्रशासनात योगदान: एक अभ्यास
*भाऊ वामन पवार*
29. मध्ययुगीन भारतातील जलव्यवस्थापन
*दिपक प्रभाकर कारंजकर, प्रोफेसर डॉ. किशोरकुमार गव्हाणे*
30. भारतीय मजदूर संघाचे कार्य आणि योगदान: एक चिकित्सक अभ्यास
*भोसले धनाजी दौलतराव*
31. छ. शिवाजी महाराजांचे लष्करी प्रशासन
*प्रा. बालाजी रावसाहेब बोडके*
32. हैदराबादच्या निजामाचा स्वतंत्र राष्ट्र उभारणीचा एक प्रयत्न – एक दृष्टिक्षेप
*डॉ. भालचंद्र गोविंदराव कुलकर्णी*
33. बीड जिल्ह्यातील ग्राम नामाचा अर्थ आणि इतिहास
*डॉ. गोरखनाथ पांडुरंगराव फसले*
34. मध्ययुगीन काळातील बलुतेदारी पद्धत आणि खेड्यांची स्वयंपूर्णता
*प्रा. डॉ. गिरीधर नागोराव सोमवंशी*
35. उत्तर मध्ययुगीन महाराष्ट्रातील वाडा स्थापत्यातील वास्तुशैलीची ठळक वैशिष्ट्ये: चिकित्सक अभ्यास
*प्रा. डॉ. जयश्री रमेश कुलकर्णी*
36. महाराष्ट्रातील बलुतेदारी पद्धत व गावांची स्वयंपूर्णता
*डॉ. माया बनसोडे*
37. बाळाबाई लाडोजीराव शितोळे देशमुख यांचे मराठ्यांच्या इतिहासातील योगदान
*प्रा. डॉ. प्रकाश बाबाराव महाजन*
38. पंढरी शिवाजी महाराजांचे शेती विषयक धोरण: एक अभ्यास
*प्रा. डॉ. सुष्माकुमार शंकरराव सरोदे*
39. स्त्रीप्रश्न आणि शेतकरी संघटना
*प्रा. डॉ. सुनिल रजपूत*
40. मुंबई प्रांतातील शेती व महसूल विषयक सुधारणा: एक अभ्यास
*अनिल तानाजी जाधव*
41. भांडवलदारांच्या दास्य श्रुंकलेतून कामगारांची मुक्ती आणि डॉ. आंबेडकरांचे योगदान
*प्रा. डॉ. बाबासाहेब नागोराव जावळे*
42. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात विदर्भातील जानकीदेवी बजाज यांचे योगदान
*प्रा. जयंतकुमार एच. रामटेके*

35.

# उत्तर मध्ययुगीन महाराष्ट्रातील वाडा स्थापत्यातील वास्तुशैलीची ठळक वैशिष्ट्ये: चिकित्सक अभ्यास

**प्रा. डॉ. जयश्री रमेश कुलकर्णी**
इतिहास विभाग प्रमुख, व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, धाराशिव.

**सारांश (Abstract):-** मध्ययुगीन भारतीय स्थापत्य संस्कृतीमध्ये वाड्यांचे स्थान अनन्यसाधारण आहे. या काळात निवासासाठी बांधलेल्या प्रशस्त वास्तू म्हणजेच वाडे हे राज्यव्यवस्था आणि अर्थव्यवस्थेचे स्थैर्य, संपन्नता आणि स्थापत्यकलेचा एक वेगळा व विकसित पैलू दर्शविणारे प्रतीक होय. मध्ययुगाच्या प्रारंभी भारताच्या प्रत्येक प्रांतात विविध सत्ताधीशांच्या अधिपत्याखाली वैविध्यपूर्ण गढ्या-वाढे, राजमहाल तयार झाले. प्रदेशानुरुप त्यांचे स्वरूप वेगळे असलेले दिसते. सोळाव्या शतकापूर्वी पासून राजस्थान अशा स्थापत्य निर्मितीबाबत अग्रेसर असून कलापूर्ण, भव्य असे वाडे, महाल तेथे बांधले गेले. त्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील वाडे मात्र साधे व कलात्मकतेपेक्षा टिकाऊ पणाला महत्त्व देणारे दिसतात. उत्तर मध्ययुगात म्हणजेच पेशवे, निजाम यांच्या कालखंडात यामध्ये बरेच कलात्मक, संरचनात्मक बदल झाले. टिकाऊपणा बरोबरच भव्यता, कलात्मकता, सौंदर्य, भौतिक सोयी सुविधा, विलासी जीवनाला पूरक अशा गोष्टींचा/वैशिष्ट्यांचा अंतर्भाव येथील वाड्यांच्या बांधणीमध्ये काही प्रमाणात झालेला दिसतो.

**कळीचे शब्द (Key words):-** वाडा, स्थापत्य, उत्तर मध्ययुग, पेशवाई, निजामशाही, वास्तुशैली, इंडो इस्लामिक, इंडो सारासेनिक, सोपे, जोते, माजघर, तळघर, बळद, दिवाणखाना, तटबंदी, गवाक्ष, नगारखाना इत्यादी.

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्राच्या पाचही प्रादेशिक विभागांमध्ये स्थापत्यकलेचा वैविध्यपूर्ण अविष्कार मध्ययुगाच्या प्रत्येक टप्प्यात पहावयास मिळतो. यादव काळापूर्वी आणि यादवकालीन महाराष्ट्रात मंदिर स्थापत्यकलेत अमुलाग्र प्रगती झाली होती. याच काळात गढ्या-वाडे, किल्ले बांधणीतही नाविन्यपूर्णता आलेली दिसते. प्राचीन भारतीय स्थापत्यातही उल्लेखिलेली वाड्यांची संकल्पना या प्रशासकीय वर्गातील वरिष्ठांच्या निवासाच्या प्रशस्त, राजेशाही आलिशान वास्तूंमधून प्रतीत होते. महाराष्ट्राबाबत बोलायचे झाल्यास मध्ययुगात साध्या व उपयोगितेवर आधारित वाड्यांची निर्मिती विपुल प्रमाणात झालेली दिसते. पण उत्तर मध्य काळात म्हणजे साधारणता इ. स. १७३० नंतर पेशव्यांनी उत्तरेत बाजी मारल्याच्या नंतर उत्तरेतील इस्लाम व मिश्र स्थापत्य शैलीचे सौंदर्य, टिकाऊपणा, भव्यता, कलाकुसर, भौतिकता, चैनविलासी जीवनशैलीस अनुकूल रचना इत्यादी गोष्टींचा स्वीकार करून दक्षिणेतील महाराष्ट्रातील गढ्या-वाडे, राजवाडे, महाल यांची निर्मिती झालेली दिसते. मात्र मूलत:च प्राचीन ग्रंथांच्या आधारे, वास्तुशास्त्रीय पद्धतीवर अवलंबून बांधकामे करण्याकडे कल असलेल्या महाराष्ट्रीय शासकांनी ती मूलभूत स्थापत्य वैशिष्ट्ये नंतरच्या काळातही जतन केलेली दिसतात.

**उद्देश:-**

महाराष्ट्रातील उत्तर मध्ययुगीन, प्रामुख्याने पेशवाई आणि निजाम सत्तेच्या काळातील वाड्यांच्या स्थापत्यातील वास्तुशैलीच्या ठळक वैशिष्ट्यांचा आणि त्यांच्या उपयुक्ततेचा समकालीन स्थापत्याशी तुलनात्मक अभ्यास करणे, हा या शोधनिबंध लेखनामागील उद्देश होय.

**संशोधन पद्धती:-**

प्रत्यक्ष क्षेत्रभेटी किंवा क्षेत्रसर्वेक्षण पद्धती, मुलाखत व माहिती संकलन पद्धती, संदर्भ साधने आणि संशोधन ग्रंथांचा वापर, साधनपरीक्षण व विश्लेषण पद्धती, तौलनिक अभ्यास पद्धती.

**विषय मांडणी:-**

'अगणित चिरे नि मातीची घरे,
पितळी फिरक्यांची सागवानी भव्य दारे|
ओस-या, पडव्या माजघरे नि अंबारे,
गाईगुरांनी नांदणारी सधन परसदारे|
नक्षीदार खांबांवर तुळया, हलकड्या नि वासे,
खिडक्या नि झरोक्यातून डोकावणारे कवडसे|
छतावरून पाझरणारे चांदणे जरासे

**New Man International Journal of Multidisciplinary Studies (NMIJMS)**
**ISSN: 2348-1390 | VOL. 12 | ISSUE 4 | APRIL 2025 | BOOK II**
*A Peer-Reviewed and Indexed Monthly E-Journal*

| | |
|---|---|
| **Full Journal Title:** | NEW MAN INTERNATIONAL JOURNAL OF MULTIDISCIPLINARY STUDIES |
| **FREQUENCY:** | MONTHLY |
| **Language:** | ENGLISH, HINDI, MARATHI |
| **Journal Country/Territory:** | INDIA |
| **Publisher:** | New Man Publication |
| **Publisher Address:** | New Man Publication<br>Shivram Nagar, Parbhani -431401<br>Mob.0 9730721393 |
| **Subject Categories:** | LANGUAGES, LITERATURE, HUMANITIES, SOCIAL SCIENCES & OTHER RELATED SUBJECTS |
| **Start Year:** | 2014 |
| **Online ISSN:** | 2348-1390 |
| **Impact Factor:** | **6.033 (SIJIF)** |
| **Indexing:** | Currently the journal is indexed in:<br>Directory of Research Journal Indexing (DRJI),<br>International Impact Factor Services (IIFS)<br>Google Scholar |


**EDITORIAL BOARD:**

*Chief Editor:*

**Dr Kalyan Gangarde,** Director, Centre for Humanities and Cultural Studies, Kalyan (W)

*Co- editors*

**Dr. Sadhana Agrawal,** Asst. Professor, Maharani Laxmibai Govt. College of Excellence, Gwalior (M.P.) India
**Dr Pandurang Barkale,** Asst. Professor, Dept of English, SNDT Women's University, Churchgate, Mumbai
**Dr Bharat Gugane,** Asst. Professor, Bhosala Military College, Nashik, Maharashtra
**Dr Dashrath Kamble,** Asst. Professor, S.B. College, Shahapur, Dist. Thane, Maharashtra
**Dr Sachin Bhumbe,** Asst. Professor, P. N. Doshi College, Ghatkopar, Mumbai

**EDITORIAL ADVISORY BOARD**

Aju Mukhopadhyay,
Dr R.T. Bedre,
Dr (Mrs.) Smita R. Nagori,
Dr Arvind Nawale
Dr Rajiv Kumar,
Dr Kailash Nimbalkar,
Tsai-ching Yeh
Dr B. N. Gaikwad,
Dr Simon Philip,
Dr Satyawan Hanegave
Dr Ramkishan Bhise

**NMIJMS DISCLAIMER:**

The contents of this web-site are owned by the NMIJMS and are only for academic publication or for the academic use. The content material on NMIJMS web site may be downloaded solely for academic use. No materials may otherwise be copied, modified, published, broadcast or otherwise distributed without the prior written permission of NMIJMS.

Academic facts, views and opinions published by authors in the Journal express solely the opinions of the respective authors. Authors are responsible for their content, citation of sources and the accuracy of their references and biographies/references. The editorial board or Editor in chief cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights.

ठिकाणी प्रवेशद्वारांवर नगारखाने, गवाक्ष/झरोके, तसेच काही ठिकाणी बुरुज, उंच जोते मध्यभागी एक किंवा अधिक चौक, चहूबाजूंनी सोपे/ओसऱ्या, त्यांना जोडून आतल्या बाजूस माजघरे, खोल्या, जोत्याखालील भागात तळघरे, अंबारखाने, लादण्या किंवा बळदी, वाड्यांच्या आतच पाण्याच्या सोयीसाठी आड अथवा विहिरी, सांडपाणी व्यवस्थापन, दोन किंवा अधिक मजले, वातायनाची विशेष काळजी, या व अशा रचनांनी युक्त असलेल्या वाड्यांमध्ये संपन्नता नांदताना दिसते. तटभिंतींना कमानी, लाकडी कोरीवकाम, काही ठिकाणी पाश्चात्य पध्दतीच्या खिडक्या, तावदाने, काचेचा वापर देखील दिसतो. असे सधन-संपन्नतेचे प्रतिक असलेले वाडे शिवकाळापेक्षा पेशव्यांच्या काळात जास्त प्रमाणात उभारलेले दिसतात. पुण्याचा नगर विकास झाल्यावर पुण्यात निरनिराळ्या ठिकाणी पेशव्यांनी भव्यवाडे बांधले, अशा नोंदी मिळतात.[१०] शिवकाळात संरक्षणाच्या दृष्टीने गडकिल्ल्यांच्या बांधकामास प्राधान्य दिलेले दिसते.

**उत्तर मध्ययुगीन महाराष्ट्रातील काही वैशिष्ट्यपूर्ण वाडे:-**

या काळातील महाराष्ट्राचा राजकीय विचार केला, तर प्रारंभी पेशवे व निजामाचा, तर नंतरच्या काळात म्हणजे १९ व्या शतकाच्या प्रारंभी निजाम, पेशवे, काही मराठा सरदार या एतद्देशीय, तर ब्रिटिश या पाश्चात्य सत्तेचा अंमल येथे दिसतो. त्यामुळे इंडो इस्लामिक आणि इंडो सारासेनिक स्थापत्य शैलीचा विकास व प्रसार महाराष्ट्रामध्ये झालेला दिसतो. या सर्व वास्तुशैलींची उदाहरणे म्हणून काही वाड्यांचा उल्लेख येथे करावा लागतो. त्यामध्ये पेशव्यांचे सत्ताकेंद्र/राजधानी असलेला शनिवारवाडा अग्रस्थानी येतो. १० जानेवारी १७३० रोजी पायाभरणी झालेला उत्तराभिमुख असलेला शनिवारवाडा दुमजली व तीन चौकी होता. वाड्याची दक्षिण-उत्तर लांबी १८४ यार्ड, पूर्व-पश्चिम रुंदी १४४ यार्ड होती. म्हणजे एकूण सहा एकरावर हा वाडा उभा केला गेला. १६ फूट चिरेबंदी व त्यावर १७ फूट विटांची अशी ३३ फूट तटबंदी, ९ बुरुज, पाच दरवाजे व आत दरबार, निवासस्थाने, भोजनगृहे, दिवाणखणे, विविध महाल, देवघरे, ग्रंथशाला, गोशाला, औषध भांडार, व्यायामशाला, कोठीशाला, वस्तू भांडार, वस्त्रागार, शस्त्रागार, हौद, विहिरी, कारंजी अशा वास्तूंनी हा वाडा परिपूर्ण झालेला होता.[११]

पेशवाईतील वाड्यांमध्ये त्यांच्या मूळच्या देशमुखीच्या ठिकाणचा, म्हणजे श्रीवर्धन येथील इ. स. १७५० मध्ये नूतनीकरण केलेला भव्य वाडाही वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यामध्ये जलकुंड, उंच जोत्यावर त्रिदली पदकशीला, पायऱ्याच्या दोन्ही बाजूस षोडशदली कमले या सौंदर्यपूर्णरचना पहावयास मिळतात.[१२] याशिवाय पेशवाई काळातील पुण्यातील शुक्रवार वाडा, विश्रामबागवाडा, बाजीराव दुसऱ्याचा वाडा, नाशिकचा सरकार वाडा[१३], कोपरगाव येथील रघुनाथराव पेशव्यांचा प्रशस्त वाडा आणि हिंगणवाडा,[१४] नाना फडणवीस यांचा मेणवली येथील वाडा, चांदवड येथील वाडे,[१५] सातारकर छत्रपतींचे जुना व नवा असे दोन वाडे[१६], भोरचा वाडा हे वाडे प्रसिद्ध आहेत. तर निजामकालीत महाराष्ट्रातील मराठवाड्याच्या परिसरात बांधलेले वाडेही अपूर्व आहेत. इ. स. १७२४ मध्ये निजाम उलमुल्क याने हैदराबाद येथे स्वतंत्र राज्याची स्थापना केली. महाराष्ट्रातील मराठवाड्याचा प्रदेश त्याचाच एक भाग बनला. या घराण्याची सत्ता इ. स. १९४८ पर्यंत या भागात होती. निजामाच्या काळातील चंद्रसेन जाधव, रामचंद्र जाधव, सुलतानजी निंबाळकर या सरदारांचे बीड परिसरातील वाडे, खंडागळे सरदारांची परभणी जिल्ह्यातील जहागिरी व वाडे, गंगाखेड येथील राजे रघुत्तमराव यांचा राजवाडा,[१७] धाराशिव येथील निजाम कालीन फिरत्या न्यायालयामुळे स्थायिक झालेल्या वकील वर्गाचे वाडे तत्कालीन स्थापत्याची साक्षात देत अद्याप उभे आहेत. तसेच पहिल्या निजामाचा औरंगाबाद नौखंडा येथील दिल्ली दरवाजालगतचा 'ऐवजखानाची बारादरी' व 'गुलशन महल' या दोन वास्तू, शेरजंगाचा अंगुरी भागातील वाडा, रावरंभा निंबाळकरांची हवेली[१८] या व अशा भव्य वास्तू अद्यापही भगनावस्थेत त्यांच्या स्थापत्यशैलीची साक्ष देत उभ्या आहेत.

**वैशिष्ट्ये:-**

पेशव्यांच्या अंमलाखालील प्रदेशातील वाड्यांच्या बांधणीत आणि निजामाच्या अंमलाखालील प्रदेशातील वाड्यांच्या बांधणीत खूप थोडे फरक दिसतात. जसे कि, निजामी परिसरातील वाड्यांमध्ये मातीच्या भेंड्यांचा वापर थोडा जास्त प्रमाणात दिसतो, तर काही ठिकाणी घराच्या खिडक्या आतील भागात उतरत्या केलेल्या दिसतात. या फरकाव्यतिरिक्त कोकण, देश, खानदेश, विदर्भ, मराठवाडा या महाराष्ट्रातील भौगोलिक व सांस्कृतिक भागात उत्तर मध्ययुगात बांधल्या गेलेल्या वाड्यांमध्ये बरेच साधर्म्यच दिसून येते.[१९] मात्र भौगोलिक किंवा हवामानातील बदलाप्रमाणे त्या त्या प्रदेशात रचनांमध्ये फरक दिसून येतो. उदाहरणार्थ:- कोकणातील उतरत्या छपराचे वाडे, तर इतर भागातील सपाट गच्चीचे वाडे.

वाडा हे केवळ निवासस्थान नसून ते व्यावसायिक, प्रशासकीय किंवा कार्यालयीन ठिकाण पण असे. काही वेळा गुन्हेगारांना ठेवण्यासाठीचा तुरुंग म्हणून पण त्याचा वापर केला जाई. उदाहरणार्थ:- पुणे जिल्ह्यातील नीरा नरसिंगपूर येथील विंचूरकरांचा वाडा [२०]. या काळातील वाड्यांनी व त्यांच्या संस्थापकांनी एका विशिष्ट संस्कृतीचा, रितीरिवाजांचा आदर्शही निर्माण केलेला दिसतो. पूर, दरोडे, नैसर्गिक आपत्तीत गावकऱ्यांचे आश्रयस्थान ठरणारे वाडे त्यांच्या आकार व क्षमतेनुसार अनेक प्रकारच्या विशेष दालनांनी युक्त असत. ओसऱ्या, खोल्या, माजघरे, तळघरे, कोठारे यांच्याबरोबरच बाळंतिणीची खोली, स्नानगृहे, जिन्नसखाना, सुशोभित खास दरबार त्यामध्ये समाविष्ट असे. काही वेळा कारागीर आपले कौशल्य पणाला लावून पारंपारिक सुशोभीकरणामध्ये आणखी भर घालून वाड्यांचे सौंदर्य वाढवीत असे. विशेषत: वरच्या मजल्यावरील दिवाणखाने, शयनकक्ष, कार्यालये यांना सजावट केली जाई. काही वेळा त्यांचे जिने बाहेरच्या बाजूला उघडत. तेथेही लाकडी कोरीव काम केले जाई. हौद, टाके, कारंजे यांच्या बांधणीतही कलात्मकता वापरली जाई. उदाहरणार्थ:- शनिवारवाड्यातील हजारी

वाड्यांच्या कवेत उरले नात्यांचे उसासे|'

असे आठवणीतले वाडे भावनेबरोबरच भारतीय, इस्लामिक व काही प्रमाणात पाश्चिमात्य वास्तुशैलीचा वारसा आधुनिक युगाला बहाल करणारे आहेत. कुठे भग्न, मोडकळीस आलेले, तर कुठे आजही दिमाखात उभे राहून अनेकांना छत्रछाया देणारे हे वाडे मागील २०० ते ३०० वर्षातील घटनांचे साक्षीदार आहेत. मध्ययुगात संपूर्ण भारतात इस्लामी वास्तुशैली व भारतीय वास्तुशैली यांचे मिश्रण (इंडो-इस्लामिक) भारतीय वास्तूंमध्ये दिसते, तर उत्तर मध्ययुगात साधारणत: अठराव्या-एकोणिसाव्या शतकात पाश्चात्त्य देशातून आलेल्या प्रामुख्याने ब्रिटिशांच्या वास्तुशैलीचाही प्रभाव त्यामध्ये आलेला दिसतो. त्यातूनच इस्लाम, भारतीय व पाश्चात्य अशा मिश्र पध्दतीची इंडो-सारासेनिक वास्तुशैली प्रसारित झालेली दिसते.

**वाडा: संकल्पना-**

'वाडा म्हणजे भव्य मोठी इमारत प्रसाद किंवा थोरामोठ्यांचे घर अथवा राजवाडा'[१] अशी वाड्याची ढोबळ व्याख्या प्रारंभी केली गेली. तर मराठी विश्वकोशानुसार 'वाडा म्हणजे एक गृह-वास्तुप्रकार. धनिक मालकाच्या आकाराने बऱ्याच मोठ्या असलेल्या निवासस्थानास मराठीत 'वाडा' हा काहीसा सन्मान दर्शक शब्द वापरतात.'[२] निवासास आवश्यक अशी अतिथिगृहे, विश्रामस्थान, भोजनगृह, दालने, मोठ्या आकाराच्या उघड्या चौकाभोवती बांधण्यात येत. सामान्यतः दोन कधी तीन चौक असत. परंतु उत्तर पेशवाईत सात-सात चौक असणारे वाडे बांधण्यात आले. मधल्या चौकामुळे सर्व दालनात हवा उजेड भरपूर प्रमाणात मिळत असत.[३]

**वाड्यांची पूर्वपीठिका:-**

प्राचीन काळापासून भारतीय संस्कृतीचा अविभाज्य घटक असलेले वाडे तत्कालीन राजकीय, सामाजिक-धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक व कलात्मक प्रगतीचे प्रतीक आहेत. तसेच स्थानिक सत्ताकेंद्र, संरक्षण केंद्र, रुढीपरंपरा व रितीरिवाज जोपासणारी केंद्रं म्हणून, तर काही वेळा जुलूमशाही, सामाजिक-धार्मिक शोषण किंवा सामाजिक, आर्थिक दरीचेही प्रतीक आहेत. उत्तर मध्ययुगीन महाराष्ट्रात अशा परस्पर विरोधी गोष्टींचे प्रतिनिधित्व करणारे वाडे विपुल प्रमाणात आढळतात.

**वाड्यांविषयीच्या नोंदी:-**

मध्ययुगीन महाराष्ट्रातील वाड्यांविषयीच्या बऱ्याच नोंदी सेतू माधवराव पगडी यांच्या लेखनातून आढळतात.[४] त्यामध्ये पेशवेकालीन पुण्यातील शनिवार वाडा, पेठे-पटवर्धन-रास्ते यांचे वाडे, नाना फडणवीस यांचा वाडा, फलटणच्या निंबाळकरांचा वाडा, मुधोळकरांचा वाडा, होळकरांचा वाडा व इतर सरदार, वतनदारांचे वाडे यांची माहिती दिली आहे.[५] तर अलीकडील काळात अनेक संशोधकांनी महाराष्ट्रातील पेशवाई व निजामकालीन किंवा प्रादेशिक वाडे या विषयांना धरून बरेच संशोधन केलेले आहे. उदाहरणार्थ:- पुणे शहरातील वाडे(डॉ मंदा खांडगे, डॉ कुलकर्णी), धाराशिव शहरातील वाडे(डॉ जयश्री कुलकर्णी),लातूर जिल्ह्यातील गढीवाडे (डॉ सुनिल पुरी), मराठवाड्यातील गढी-वाडे (डॉ बिराजदार)इत्यादी.

**वाड्यांची भूमीनिवड व साधने/सामग्री:-**

प्राचीन काळापासून मोठ्या वास्तू बांधताना त्या दीर्घकाळ टिकाव्यात यासाठी योग्य ते माती व भूपरीक्षण करून भूमीनिवड केली जात असे. त्यासाठी जमिनीत खड्डा करून त्यामध्ये पाणी भरून काही दिवसांनी त्याची बाण मारून पाहून चाचणी घेतली जात असे. त्या जागी १५ ते ६० दिवस पांढरी माती भिजवून ठेवून तिचा चिवटपणा पाहिला जात असे. अशा प्रकारच्या भूमी परीक्षण व माती तयार करण्याच्या विविध तंत्रांची माहिती समरांगण सूत्रधार, गृहसूत्र, माणसार, बृहत् संहिता, अपराजितपृच्छा, हयशिर्ष, पश्चरात्र, राजवल्लभ, शिल्पदीपक, अग्निपुराण व मत्स्यपुराण अशा संस्कृत ग्रंथांमधून मिळते.[६] या प्राचीन तंत्रांचे बऱ्याच प्रमाणात अनुकरण मध्ययुगीन महाराष्ट्रातील वाडेबांधणीत केलेले दिसते. तसेच वास्तुशास्त्रातील नियमांचेही पालन केलेले दिसते. उदाहरणार्थ:- पूर्व-पश्चिम अथवा उत्तराभिमुख घरे, अग्नेयेस स्वयंपाकगृह, वायव्य दिशेस शयनकक्ष, नैऋत्येस स्वच्छतागृहे, ईशान्येस देवघरे, तसेच घराच्या मध्यभागास ब्रह्म स्थानाचे महत्त्व इत्यादी.

बांधकामासाठी या काळात दगड, माती आणि भाजक्या किंवा कच्च्या विटा ही प्रमुख सामग्री वापरली जात असे. काळ्या पाषाणांमध्ये बाह्य तटबंदी व भिंती बांधल्या जात, तर आतील खोल्यांच्या भिंतीसाठी इष्टिका/विटा वापरल्या जात. दगड, विटा सांधण्यासाठी चुना, माती किंवा गुळ-चुना-चिंचोके यांचे मिश्रण वापरले जाई. याशिवाय खांब, तुळया, खांडे, नक्षीदार कमानी व सुशोभीकरणासाठी काष्ठ/लाकूड व काही प्रमाणात पोलाद/लोखंडाचा वापर केला जाई.[७] बांधकामाकरिता सिमेंटचा उपयोग मात्र १९ व्या शतकात सुरू झाला.[८] वास्तुकलेच्या बांधकाम प्रक्रियेत जमीन पक्की करण्यापासून बांधकामातील ठळक टप्पे ठरविणे, बांधकाम खर्च, साहित्य-सामग्री, दळण-वळण, कारागिरी तंत्रज्ञान, वास्तूरचनेतील संकल्पना, कौटुंबिक गरजा इत्यादी गोष्टींचा विचार सुरुवातीला केला जाई.[९]

**वाड्यांची रचना:-**

प्रशस्त जागेत बहुधा चौकोनी, काही वेळा आयताकृती बांधकाम, चौहूबाजूंनी बंदिस्त दगडी तटबंदी, काही ठिकाणी बुरुज, त्यावर जंगी-चर्या, तोफा, टेहळणीसाठी जागा, भक्कम आणि भव्य लाकडी अथवा लोखंडी एक किंवा अनेक प्रवेशद्वारे, भिंतीतील जिने, काही

# Editorial

Welcome to the April issue of *NMIJMS*, where we present a good collection of research papers that illuminate India's past and present through diverse lenses. This issue brings together scholars who explore revolutionary movements, environmental challenges, women's contributions, and traditional systems, offering fresh insights into India's complex history and society.

India's fight for freedom was shaped by countless individuals and groups, many of whom are celebrated in this issue. Arijit Nag takes us to colonial Bengal (1870–1900), uncovering the secretive societies that fueled early revolutionary zeal. Similarly, papers by Dr. Sheikh Husain Imam, Dr. Arun Shivram Bawa, and others highlight the pivotal roles women played in the 1857 uprising and the broader independence movement, reminding us of their courage and sacrifice. From Maharashtra's armed revolutionaries to unsung heroes like Virbhai Kotwal, these studies reveal the depth of India's struggle for liberty.

Environmental concerns, both historical and contemporary, are a key focus of this issue. Dr. Tanmay A. Paithankar and Dr. Gorakh P. Rathod examine the politics of climate change, offering insights into modern environmental governance. Meanwhile, Mukund Janardhan Telap and others delve into medieval India's water management systems, showcasing innovative techniques that sustained communities centuries ago. Contributions like Dr. Prashant A. Sable's study on Malik Amber's water management in Ahmednagar and Dr. K.J. Gavhane's historical analysis of India's environmental movements connect past wisdom with present-day challenges.

The role of women in shaping India's history shines brightly in this issue. From medieval Muslim dynasties to modern social movements, papers by Dr. D.N. Rithe, Dr. Sunita Gitte, and Dr. Vaishali Bagul celebrate women's leadership in politics, administration, and labor movements. Notable figures like Maharani Tarabai and Nawab Sultan Jahan Begum are explored, alongside broader studies on women's advocacy through commissions and their contributions to the freedom struggle. These works underscore the enduring strength of women in Indian society.

This issue also dives into India's traditional and modern socio-economic frameworks. Dr. R.A. Chavan and Dr. Giridhar Somvanshi explore the *balutedari* system, which made villages self-sufficient in medieval Maharashtra. Agricultural reforms under Chhatrapati Shivaji Maharaj and leaders like Sharad Joshi are analyzed, highlighting their impact on farmers. Labor movements, led by figures like Narayan Meghaji Lokhande and Dr. B.R. Ambedkar, are examined for their role in uplifting workers, while studies on caste, untouchability, and tribal education reflect on social justice.

India's cultural and spiritual legacy is another thread woven through this issue. Dr. Babasaheb Shep's work on Sant Jagmitra Naga's contributions to the Warkari tradition and Dr. Vitthal Gunde's study of Hampi's Vitthal Swami temple showcase the richness of India's devotional and architectural heritage. Papers on Gandhara art and Jataka tales further enrich our understanding of India's ancient cultural tapestry.

कारंजे, कमलाकार हौद इत्यादी. वाड्यांचे सगळ्यात महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे तो वातावरणाशी मैत्री साधणारा म्हणजे उन्हाळ्यात थंड राहणारा, तर हिवाळ्यात उबदार राहणारा असा वातावरणाचे संतुलन राखणारा असतो.

**निष्कर्ष:-**

१. उत्तर मध्ययुगीन वाड्यांची वास्तुशैली प्रामुख्याने इंडो इस्लामिक तर काही ठिकाणी इंडो सारसेनिक पद्धतीची दिसते.
२. या वाड्यांच्या बांधकामात पर्यावरणीय भान आणि सामाजिक स्थितीचा आधार असलेला दिसतो.
३. बांधकामात वास्तुशास्त्राचे पालन, भक्कमपणा, टिकाऊपणा, प्रशस्तता, संरक्षणात्मकता, अंतर्गत सर्व सुखसोयी, अस्थिर व असुरक्षिततेच्या परिस्थितीच्या दृष्टीने तळघरे, गुप्त दरवाजे, शस्त्रागारे यांची सुविधा या गोष्टींना महत्त्व दिलेले दिसते.
४. या वाड्यांमध्ये भिन्न सांस्कृतिक परंपरांची, नीती व संस्कृतीची जोपासना तसेच पारंपारिकते बरोबर नवीन तंत्रज्ञानाचा मिलाप झालेला दिसतो.
५. उत्तर मध्ययुगीन वाडे एकत्र कुटुंब पद्धतीचे प्रतीक असून सर्वसमावेशकता हे त्यांचे वैशिष्ट्य दिसते. बांधकामाच्या कामात आलुतेदार, बलुतेदार, पगडबंधांचा समावेश करून घेतलेला दिसतो.

**तळटीपा:-**


१. संपादक: यशवंत दाते, चिंतामणी कर्वे-महाराष्ट्र शब्दकोश, विभाग सहावा-वरदा बुक्स, पुणे-१९९५-सुधारित तृतीय आवृत्ती-पृष्ठ क्रमांक २७८८.
२. संपादक: तर्कतीर्थ श्री लक्ष्मण शास्त्री जोशी-मराठी विश्वकोश, खंड १५-महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई-१९९५- प्रथम आवृत्ती-पृष्ठ क्रमांक १२८८,८९.
३. कित्ता
४. संपादक: डी पी जोशी-समग्र सेतू माधवराव पगडी-मराठी साहित्य परिषद, हैदराबाद-२०१०- प्रथम आवृत्ती- प्रस्तावना , पृष्ठ क्रमांक ८.
५. सेतू माधवराव पगडी-मोगल दरबाराची बातमीपत्रे, भाग १-महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई-१९७८- प्रथम आवृत्ती-पृष्ठ क्रमांक ७.
६. र. तु. कुलकर्णी-भारतीय वास्तुशास्त्र-मध्य भारत हिंदी साहित्य समिती, इंदौर-१९९५-पृष्ठ क्रमांक १ ते १०.
७. के. दे. कावडकर-ऐतिहासिक वारसा स्थळांचे जतनशास्त्र-विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद-२०२३-प्रथम आवृत्ती-पृष्ठ क्रमांक ४० ते ५४.
८. कित्ता.-पृष्ठ क्रमांक ६२.
९. नरेंद्र डेंगळे-महाराष्ट्रातील वास्तुकला: परंपरा आणि वाटचाल, खंड १- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई-२०२४-प्रथम आवृत्ती-पृष्ठ क्रमांक २७.
१०. डॉक्टर वर्षा शिरगावकर-पेशव्यांचे विलासी जीवन-कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे-२००१-प्रथम आवृत्ती-पृष्ठ क्रमांक ५१
११. प्रमोद ओक-पेशवे घराण्याचा इतिहास-कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे-२००१-तिसरी सुधारित आवृत्ती-पृष्ठ क्रमांक ३२.
१२. कित्ता-पृष्ठ क्रमांक २९.
१३. कुळे मुकुंद-ऐतिहासिक वाडे,लेख-चित्रलेखा-२००१-मुंबई-पृष्ठ क्रमांक ११२.
१४. प्रमोद ओक-पेशवे घराण्याचा इतिहास-कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे-२००१-तिसरी सुधारित आवृत्ती-पृष्ठ क्रमांक ३५८ ते ६१.
१५. कुळे मुकुंद-ऐतिहासिक वाडे,लेख-चित्रलेखा-२००१-मुंबई-पृष्ठ क्रमांक ११२.
१६. सदाशिव शिवदे-सातारा येथील अदालतवाडा व शाहू महाराजांच्या ऐतिहासिक वास्तूंचे अवशेष-लेख, दैनिक लोकसत्ता, मुंबई-१७.१२.२०११-पृष्ठ २.
१७. डॉ. सुनील पुरी-महाराष्ट्रातील मध्ययुगीन नागरी स्थापत्य-गढी-वाडे: एक अभ्यास (लातूर जिल्ह्याच्या विशेष संदर्भात) यूजीसी लघुशोध प्रकल्प-सप्टेंबर २०१३-पृष्ठ क्रमांक ९७.
१८. कित्ता.
१९. नरेंद्र डेंगळे-महाराष्ट्रातील वास्तुकला: परंपरा आणि वाटचाल, खंड १- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई-२०२४-प्रथम आवृत्ती-पृष्ठ क्रमांक २९५.
२०. कित्ता.




New Man International Journal of Multidisciplinary Studies (NMIJMS) ISSN: 2348-1390

□□□